अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | मंगळवार
१७.११.२०२६

वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २८७ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

अमित शाह यांचा चकाट्या पिटणारा गृहमंत्री असा उल्लेख, मणिपूर, अरुणाचल प्रदेशला जाण्याचं चॅलेंज, उद्धव ठाकरेंचा शाहांवर हल्लाबोल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई - शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर हल्लाबोल केला आहे. अमित शाह यांनी काल पुण्यातील कार्यक्रमात नाव न उद्धव ठाकरेंवर टीका केली होती. त्या टीकेला प्रत्युत्तर देत ठाकरे यांनी अमित शाह यांचा उल्लेख चकाट्या पिटणारा गृहमंत्री असा केला आहे. अमित शाह हे किती दिवसांनी अवतीर्ण झाले आहेत. कारण दिल्लीत जेन झीवर अत्याचार केल्यानंतर लोकसभेत ते बाथरुमला जायचे पण सभागृहात येत नव्हते, असा हा चकाट्या पिटणारा गृहमंत्री, त्यांनी आपल्या कारकि?र्दीत चकाट्या पिटण्याखेरीज दुसरं काय केलं असं वाटत नाही, अशा शब्दात ठाकरेंनी शाह यांच्यावर टीका केली.

अमित शाह यांनी अजित पवारांची माफी मागावी उद्धव ठाकरे म्हणाले की खरं म्हणजे काल माझी अशी अपेक्षा होती, ज्या अजित पवारांना त्यांच्या हयातीत ७० हजार कोटींचा घोटाळा केला म्हणून भ्रष्टाचाराच्या आरोपांनी जीवन मुश्कील करुन ठेवलं होतं. त्याच अजित पवारांचा पुतळा या चकाट्या पिटणाऱ्या अमित शाह यांच्या हस्ते त्याचं अनावरण होणं हे दुर्भाग्याचं लक्षण होतं. पण अपेक्षा अशी होती की अनावरण केल्यानंतर अजित पवारांच्या पुतळ्यासमोर अमित शाह नाक रगडून अजित पवारांची माफी मागतील. आम्ही तुमच्यावर केलेले आरोप खोटे होते, तुम्ही थोर होतात. जी थोरवी त्यांनी काल गायली त्यातले दोन शब्द तरी अजित पवार हयात असताना बोलते असते तर अजित पवारांना समाधान लाभलं असतं, खोटं बोलणाऱ्या माणसांबाबत मला काही बोलायचं नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले. काल एक मी क्लिप बघितली, ज्याच्यामध्ये आपल्याच माध्यमातून देशामध्ये कोविडच्या काळात सर्वोत्तम मुख्यमंत्री महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचं, तत्कालीन मुख्यमंत्री म्हणून मी होतो, मात्र सर्व श्रेय यंत्रणांचं होतं.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ४ महत्त्वाचे निर्णय

*** पालघर जिल्ह्याचा झोन-४ काढून झोन- १ मध्ये समावेश, चंद्रकांत पाटलांच्या खात्याबाबत महत्त्वाची घडामोड**



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई - राज्य मंत्रिमंडळाची नियोजित आठवड्याची बैठक मंगळवारी मंत्रालयात पार पडली. यावेळी राज्य सरकारने प्रशासकीय पातळीवरील चार महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यानुसार नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलांकडून यापूर्वी लुटून नेलेल्या शस्त्रांबाबत माहिती देणाऱ्यांसाठी रोख बक्षीस योजना जाहीर करण्यात आली आहे. तसेच पालघर जिल्ह्याबाबत दोन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरणात सुधारणा करुन पालघर जिल्ह्याचा आता झोन-१ मध्ये समावेश करण्यात आला आहे. झोन-४ वर्गवारी रद्द आणि विस्तारीकरण नियमातही बदल करण्यात आला आहे. मंत्रिमंडळ निर्णय नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलांकडून यापूर्वी लुटून नेलेल्या शस्त्रांबाबत माहिती देणाऱ्यांसाठी रोख बक्षीस योजना. राज्यातील उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने शैक्षणिक क्षेत्रात होऊ घातलेले बदल लक्षात घेऊन सुधारणा करण्यात येणार. एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरणात सुधारणा. पालघर जिल्ह्याचा आता झोन-१ मध्ये समावेश. झोन-४ वर्गवारी रद्द आणि विस्तारीकरण नियमातही बदल. पालघर जिल्ह्यासाठी पालघर येथे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय तसेच मुख्य दंडाधिकारी न्यायालयाची स्थापना होणार. सरकारी वकील कार्यालयांसह अनुषांगिक पदांच्या निर्मितीस मंजुरी. राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांचा एका महिन्याचा पगार दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी: सुनत्रा पवार राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवांना आर्थिक मदत मिळावी, या उद्देशाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विधानसभा व विधान परिषदेतील सर्व आमदारांनी आपले एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीस देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आज मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या हस्ते या वेतनाचे धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

थोडक्यात

दिल्लीत पुन्हा इमारत कोसळली : चिमुकल्यासह दोघांचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

नवी दिल्ली - राजधानी दिल्लीत इमारती कोसळण्याच्या घटना थांबण्याचं नाव घेत नाहीत. दोन दिवसांपूर्वीच पहाडगंज परिसरात इमारत कोसळल्याची घटना घडली होती. त्यानंतर आता मंगळवारी (दि.१७) सकाळी शाहदरा येथील विवेक विहारमधील ज्वाला नगर परिसरात जुनी दोन मजली इमारत कोसळल्याने पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. या दुर्घटनेत ३ वर्षांच्या चिमुकल्यासह दोघांचा मृत्यू झाला असून, ४ जण जखमी झाले आहेत. इमारतीच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या ६ जणांना बाहेर काढण्यात आलं आहे. माहितीनुसार, मृत आणि जखमी झालेले सर्व जण या इमारतीत भाड्याने राहत होते.

विविध मागण्यांसाठी शिवसेनेचे बंडू साऊत यांचे अंबाडा येथे आकंठ दफन आंदोलन

पाणीपुरवठा, शेतकरी मदत, रोजगार हमी व शासकीय योजनांच्या प्रश्नांवर प्रशासनाचे वेधले लक्ष

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मोर्शी - मोर्शी तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने माजी जिल्हा परिषद सदस्य बंडू साउत यांनी सोमवार, दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी अंबाडा येथील बसस्थानकासमोर आकंठ दफन आंदोलन केले.

या आंदोलनाच्या माध्यमातून प्रामुख्याने दहा मागण्या मांडण्यात आल्या आहेत. चारघड प्रकल्पांतर्गत मंजूर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणीपुरवठा योजनेत समाविष्ट असलेल्या मोर्शी तालुक्यातील २३ गावांना तातडीने पाणीपुरवठा सुरू करावा, अंबाडा गावासाठी तीन लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी व पाणीपुरवठा विहीर मंजूर करावी, तसेच अंबाडा ग्रामपंचायतीतील जन्माचे दाखले मिळण्याची अडचण दूर करून ग्रामस्थांना दाखले उपलब्ध करून द्यावेत, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. याशिवाय, रेशन कार्ड असूनही धान्य न मिळणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना तातडीने रेशन सुरू करावे, बंद झालेल्या लाडकी बहीण योजनेचे थकीत वेतन सुरू करावे, दुष्काळामुळे काम नसलेल्या शेतमजुरांना ४० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी, तसेच शेतकऱ्यांना शासनाने घोषित केलेली एक लाख रुपयांची आर्थिक मदत तातडीने द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

मोर्शी तालुक्यातील वीज ग्राहकांवर स्मार्ट मीटर लादू नयेत, जुने मीटर कायम ठेवावेत, याबाबत महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांचे लेखी पत्र मिळावे, मायक्रो फायनान्स कंपन्यांनी शेतकरी व शेतमजूर वर्गाकडून कर्जाचे हप्ते वसूल करणे तातडीने बंद करावे आणि दुष्काळी परिस्थितीत मजुरांना रोजगार मिळण्यासाठी रोजगार हमी योजनेची कामे त्वरित सुरू करावीत, या मागण्यांचाही समावेश आहे.

दरम्यान, वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी चर्चा केली. संबंधित कामे करून देण्याचे आश्वासन दिल्यानंतर त्यांच्या हस्ते उपोषणाची सांगता करण्यात आली.

दुपारी ३ वाजता तहसीलदार चारुदत्त पाटील, पुरवठा विभागाचे सौरभ बिजवे, ग्राम महसूल अधिकारी श्रीराम अर्डक आणि पाणीपुरवठा अधिकारी उमप साहेब, महावितरण कार्यालयाच्या वतीने दिपराज मोहने आणि सागर कोकडे अंबाडा ग्रामपंचायतचे प्रशासक प्रफुल भेले आणि ग्रामविकास अधिकारी पवन सोमवंशी इत्यादी उपस्थित होते.

या आंदोलनात चेतन जवंजाळ, ओंकार काळे, शहरप्रमुख निलेश आघाडे, तालुकाप्रमुख मुरलीधर डहाणे, दानिश पटेल, वसंत साकोम, काँग्रेसचे कार्यकर्ते विपुल भडांगे,उमेश शहाणे यांच्यासह शिवसेनेचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या विविध मागण्यांसाठी आयोजित आकंठ दफन आंदोलनात शिवसैनिक, शेतकरी, शेतमजूर व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी झालेले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते मनिलातील शतकी जुन्या 'खालसा दिवाण' गुरुद्वाराच्या पुनर्विकासाचे भूमिपूजन : पाच मजली भव्य संकुल उभारणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मनिला - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या फिलिपिन्स दौऱ्यादरम्यान मंगळवारी मनिला येथील ऐतिहासिक 'खालसा दिवाण' गुरुद्वाराच्या आधुनिकीकरण आणि पुनर्विकासाच्या भूमिपूजन सोहळ्यात सहभाग घेतला. शेकडो वर्षांचा वारसा लाभलेल्या या शीख प्रार्थना स्थळाच्या नव्या स्वरूपाचा पाया पंतप्रधानांच्या हस्ते रचण्यात आला. परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनानुसार, हा गुरुद्वारा प्रथमतः १९०१ मध्ये स्थापन करण्यात आला आणि १९०३ मध्ये तो औपचारिकपणे संघटित झाला. त्यानंतर १९२४ मध्ये 'खालसा दिवाण' म्हणून याची अधिकृत नोंदणी करण्यात आली. फिलिपिन्समधील सर्वात जुना गुरुद्वारा असण्याचा मान या वास्तूला मिळाला असून, तो मनिलामधील शीख आणि इतर समुदायांसाठी अध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर राहिला आहे.



फोर्स वन आता एटीएसच्या नियंत्रणाखाली : दहशतवादी हल्ल्यांचा काही वेळातच खात्मा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – दहशतवादविरोधी यंत्रणेचा समन्वय प्रभावी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्य सुरक्षा दलातील विशेष कमांडो पथक असलेल्या 'फोर्स वन'चे प्रशासकीय आणि कार्यकारी नियंत्रण आता दहशतवादविरोधी पथकाकडे (एटीएस) सोपविण्यात येणार आहे. त्यामुळे दहशतवादी कारवायांना प्रतिबंध करण्यापासून ते प्रत्यक्ष दहशतवादी हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यापर्यंतच्या कामकाजासाठी एकसंध नेतृत्व उपलब्ध होणार आहे. राज्य सरकारने याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर जोखमीच्या दहशतवादी घटनांना प्रत्युत्तर देण्यासाठी शस्त्रसज्ज, विशेष प्रशिक्षणप्राप्त कमांडो दल म्हणून फोर्स वनची स्थापना करण्यात आली, तर दहशतवादी कारवायांना प्रतिबंध करणे, गुप्त माहिती गोळा करणे, विश्लेषण करणे, दहशतवादी संघटनांविरोधात कायदेशीर कारवाई व तपास करण्याची जबाबदारी एटीएसकडे आहे. त्यानुसार दहशतवादविरोधी कारवायांचे एकात्मिक नियोजन, गुप्त माहितीच्या आधारे कारवाईचे समन्वयन, दहशतवादी हल्ल्याच्या वेळी फोर्स वनला पाचारण करणे, कमांडो कारवाईचे नियोजन आणि अंमलबजावणी यामध्ये एटीएसच्या नेतृत्वाखाली समन्वय साधला जाणार आहे. कर्मचाऱ्यांच्या सेवा अटींमध्ये बदल नाही या नियंत्रण हस्तांतरणामुळे फोर्स वनच्या विद्यमान पदसंरचनेत, मनुष्यबळात, आर्थिक तरतुदीत किंवा कर्मचाऱ्यांच्या सेवा-अटींमध्ये कोणताही बदल होणार नाही, असे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

आरक्षणाच्या चक्राकार धोरणाविरुद्धची याचिका रद्द : नियमांच्या पुनर्विचारासाठी सरकारकडे अर्ज करा - सुप्रीम कोर्ट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



नवी दिल्ली – महाराष्ट्र सरकारने जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातील चक्राकार आरक्षणासंदर्भात केलेल्या नियमांना आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळून लावली. त्यामुळे नियम लागू झाल्यानंतर होणारी जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची निवडणूक ही राखीव जागांच्या फेरपालट प्रक्रियेतील पहिली निवडणूक मानली जाणार आहे.

न्या.जॉयमाल्य बागची आणि न्या.व्ही.मोहना यांच्या खंडपीठाने रुपाली इंद्रभूषण सोंडे यांनी दाखल केलेली याचिका फेटाळली. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने १९ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या निर्णयाला आव्हान देण्यात आले होते. याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील विपिन सांघी यांनी केलेल्या युक्तिवादाची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारकडे फेरपालट धोरणांतर्गत एससी आणि एसटी प्रवर्गांसाठी जागा राखीव ठेवण्यासंदर्भातील नियमांचा पुनर्विचार करण्यासाठी निवेदन सादर करण्याची परवानगी दिली.

कोणत्याही मतदाराला किंवा उमेदवाराला एखादा मतदारसंघ अनुसूचित जाती अथवा जमातींसाठी राखीव असल्याचे जाहीर करण्याचा कायदेशीर अधिकार नाही, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. राखीव जागांच्या फेरपालटाचा निर्णय हा धोरणात्मक बाबींच्या कक्षेत येतो.

राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस व मेंटल अरिथमॅटिक स्पर्धेत

न्यू इंग्लिश स्कूलच्या नक्षत्रचे उल्लेखनीय यश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – चौथ्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस व मेंटल अरिथमॅटिक स्पर्धा २०२६ अहमदाबाद गुजरात १४ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित स्पर्धेमध्ये वरुड येथील न्यू इंग्लिश प्रायमरी स्कूलची इयत्ता ६ वी मध्ये शिकत असलेली नक्षत्र मेघा संजयराव गुल्हाने येथे याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या राष्ट्रीय स्पर्धेत त्याने थर्ड रनर-अप (तृतीय उपविजेता) हा मान पटकाविला.

क्युबॅटिक एज्युटेक प्रा.लि.अहमदाबाद प्रस्तुत 'सुपर माइंड्स'च्या वतीने आयोजित या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देशभरातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर नक्षत्रने उत्कृष्ट कामगिरी करत यशाला गवसणी घातली.

नक्षत्रच्या या यशामुळे वरुड शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्याचे या यशाबद्दल आई-वडील, नातेवाईक, शिक्षक आणि मित्रपरिवाराकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

नक्षत्रच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत. त्याचे या संपादित केलेल्या यशाचे श्रेय त्याने त्याच्या शिक्षिका प्रीती डांगोरे पारडसिंगा व आई वडील, बहीण व सर्व नातेवाईक यांना देत आहे.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात शंभरहून अधिक दिवाळी अंकांचे प्रदर्शन

वाचकांसाठी सात दिवस विनामूल्य पर्वणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



अमरावती – महात्मा जोतीराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त राबविण्यात येत असलेल्या 'महात्मा फुले प्रेरणा सप्ताह' विशेष अभियानांतर्गत अमरावती जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात दिवाळी अंक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

वाचकांना दिवाळीच्या निमित्ताने दर्जेदार साहित्याचा आस्वाद घेता यावा, या उद्देशाने हे प्रदर्शन भरवण्यात आले आहे.

ज्येष्ठ वाचक अनिल राजेनिंबाळकर यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. कार्यालयातील कर्मचारी राजाराम देवकर, संतोष मिश्रा, संजय देशमुख आणि वाचनालयातील विद्यार्थी वाचक उपस्थित होते. या प्रदर्शनात १०० हून अधिक विविध नामवंत दिवाळी अंक वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

सर्व साहित्यप्रेमी आणि वाचकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन या साहित्यिक मेजवानीचा लाभ घ्यावा, तसेच जास्तीत जास्त नागरिकांनी ग्रंथालयाचे सभासद व्हावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ.अतुलपुं.वानखडे यांनी केले आहे.

मधुकर कनेर यांचे निधन



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

हिवरखेड – येथील संत्रा व्यवसायी व संत्रा कलमाचे उत्पादक शेतकरी मधुकर लक्ष्मणराव कनेर यांचे नुकतेच अल्पशा आजाराने वयाच्या ८३ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांचेवर निर्मिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याचे मागे पत्नी, २ मुले, सुना, २ मुली, जावई व नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे त्यांच्या पार्थिवावर हिवरखेड मोक्षधाम येथे स्वकीय, आप्तेष्ट, नातेवाईक आणि ग्रामवासियांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

सरपंच पदासाठी २० नोव्हेंबरला आरक्षण सोडत



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

अमरावती – जिल्ह्यातील सार्वत्रिक निवडणुकीद्वारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त होत असल्यामुळे, शासनाच्या निर्देशानुसार आरक्षणामध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

केवळ नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग (महिलांसह) बदल होत असल्याने यासाठी शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर रोजी संबंधित तहसिल कार्यालयात आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ग्रामपंचायत निवडणूक विभागाने दिलेल्या माहितीनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या आरक्षणामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. केवळ नागरिकांचा मागास प्रवर्ग व खुला प्रवर्ग (महिलांसह) यांच्या आरक्षणामध्ये बदल होणार आहे. सुधारीत आरक्षण निश्चित करण्यासाठी तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायतींचे सरपंचपदाचे प्रवर्गनिहाय आरक्षण महिलांसह निश्चित करण्यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व संबंधित तालुक्यांमध्ये प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदार आणि नियंत्रण अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही सोडत पार पडणार आहे. अमरावती तालुक्यासाठी अनिलकुमार भटकर, संतोष आठरे, भातकुली तालुक्यासाठी महेश घाटुळे, अक्षय मांडवे, मोर्शी तालुक्यासाठी प्रदिप पवार, सागर ढवळे, वरूड तालुक्यासाठी प्रदिप पवार, रामदास शेळके, दर्यापूर तालुक्यासाठी राजेश्वर हांडे, डॉ.रविद्रकुमार कानडजे, अंजनगाव सुर्जी तालुक्यासाठी वैष्णवी बाविस्कर, पुष्पा दाभेराव, अचलपूर तालुक्यासाठी बळवंत अरखराव, सुदर्शन शहारे, चांदूर बाजार तालुक्यासाठी सुनिल टाकळे, योगेश गाडे, धामणगाव रेल्वे तालुक्यासाठी तेजश्री कोरे, अभय घोरपडे यांच्या उपस्थितीत आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

संबंधित तालुक्यातील नागरिक आणि ग्रामपंचायत सदस्यांनी या सोडतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रामपंचायत निवडणूक प्रभारी अधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांनी केले आहे.

पंतप्रधान मोदींचा फिलिपिन्सच्या 'बॅरोंग टॅगालॉग' पोशाखात रॉयल लूक : 'गाला डिनर'मध्ये वेधले जागतिक नेत्यांचे लक्ष!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मनिला – पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या तीन दिवसांच्या फिलिपिन्स दौऱ्यावर असून, सोमवारी संध्याकाळी ते मनिला येथील 'फिलिपिन्स आंतरराष्ट्रीय कन्व्हेन्शन सेंटर'मध्ये आयोजित भव्य 'गाला डिनर'साठी दाखल झाले.

फिलिपिन्सचे राष्ट्राध्यक्ष फर्डिनांड आर. मार्कोस यांनी ४९ व्या आसियान शिखर परिषदेसाठी आलेल्या जगभरातील मान्यवर नेत्यांच्या सन्मानार्थ या शाही मेजवानीचे आयोजन केले होते. 'नॅव्हिगेटिंग द फ्युचर' (भविष्याची वाटचाल ठरवणे) या संकल्पनेवर ही परिषद होत आहे. या सोहळ्यात पंतप्रधान मोदींचा लूक सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. त्यांनी चक्क फिलिपिन्सचा राष्ट्रीय आणि पारंपरिक पोशाख असलेला 'बॅरोंग टॅगालॉग' परिधान केला होता. विशेष म्हणजे, राष्ट्राध्यक्ष मार्कोस यांनीही असाच पोशाख घातला होता, ज्यामुळे दोन्ही नेत्यांमधील मैत्रीपूर्ण संबंध दिसून आले. या रात्रीच्या मेजवानीपूर्वी, दिवसाच्या सुरुवातीला पंतप्रधान मोदी मनिला विमानतळावर पोहोचताच तिथे जमलेल्या अनिवासी भारतीयांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले. मोदींनीही तितक्याच आपुलकीने सर्वांशी संवाद साधला. यानंतर त्यांनी रामायणावर आधारित एका विशेष नाट्यप्रयोगाला हजेरी लावून आपल्या दौऱ्याची सांस्कृतिक सुरुवात केली.

इलिगन शहरातील 'इंटिग्रेटेड परफॉर्मिंग आर्ट्स गिल्ड' या संस्थेने सादर केलेला 'सीता: द रामायण रिव्हिजिटेड' हा नाट्यप्रयोग मोदींनी पाहिला.

झेनिथ कॉन्सेप्ट स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

'अग्निपथ - जीवनाचा प्रवास' या संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी सादर केला नातेसंबंधांचा भावस्पर्शी आविष्कार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मोर्शी – प्रसाद शिक्षण संस्था, अमरावती संचलित झेनिथ कॉन्सेप्ट स्कूल, तळणी-मोर्शी येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात व दिमाखात पार पडले.

'अग्निपथ - जीवनाचा प्रवास' या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य आणि विविध कलाविष्कारांतून मानवी जीवनातील संघर्ष, नातेसंबंध, स्वप्ने आणि यशाचा प्रवास प्रभावीपणे सादर केला.

कार्यक्रमाचे उद्घाटन मोर्शीचे पोलीस निरीक्षक राहुल आठवले, प्रा.डॉ.रजनी देशमुख आणि संस्थाध्यक्ष प्रा.एम.टी.नाना देशमुख यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी आंतरराष्ट्रीय नृत्यकलाकार शंतनू ठाकरे, शास्त्रीय नृत्यांगना वैदेही काकडे तसेच संस्थेचे पदाधिकारी प्रा.डॉ.सावन एम. देशमुख उपस्थित होते.

आईचे निधन झाल्यानंतर वडिलांनी मुलींचा केलेला सांभाळ, मुलीचा विवाह आणि पुढे तिचे आयपीएस अधिकारी होण्यापर्यंतचा प्रेरणादायी जीवनप्रवास विद्यार्थ्यांनी नाट्यप्रयोगातून साकारला. या सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. विशेषतः आजी-आजोबा आणि कुटुंबातील नात्यांचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या प्रसंगांनी प्रेक्षक भावूक झाले.

शाळेची आयसीएसइ बोर्ड परीक्षा केंद्र म्हणून निवड झाली असून यंदा दहावीची पहिली बॅच बोर्ड परीक्षेला सामोरी जाणार आहे. या पार्श्वभूमीवर शैक्षणिक नियोजनाला प्राधान्य देत यापुढे वार्षिक स्नेहसंमेलन दिवाळीपूर्वी घेण्याचा निर्णय शाळा व्यवस्थापनाने घेतला आहे.

प्राचार्य डॉ.दिपाली सावन देशमुख यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. पालकांसह आजी-आजोबांची मोठ्या संख्येने उपस्थिती हे या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळालेल्या व्यासपीठामुळे आणि झेनिथ परिवाराच्या सांघिक प्रयत्नांमुळे हा स्नेहसंमेलन सोहळा संस्मरणीय ठरला.

संपादकीय

चांगले दिवस येण्यासाठी नशिबाची वाट पाहू नका, आपल्या मेहनतीने दिवस चांगले बनवा

खालसा दिवाण गुरुद्वाराचा पुनर्विकास : भारताच्या सांस्कृतिक वारशाचा जागतिक सन्मान!

भारताची ओळख ही केवळ भौगोलिक सीमा, आर्थिक प्रगती किंवा राजकीय सामर्थ्यापुरती मर्यादित नाही. भारताची खरी ओळख त्याच्या समृद्ध संस्कृतीत, धार्मिक परंपरांत, मानवतेच्या मूल्यांत आणि जगभर पसरलेल्या सांस्कृतिक वारशात दडलेली आहे. भारतीय संस्कृतीने जगाला बंधुभाव, सेवा, समर्पण आणि सहअस्तित्वाचा संदेश दिला आहे. याच भारतीय संस्कृतीचा गौरव अधोरेखित करणारी महत्त्वपूर्ण घटना फिलिपिन्सची राजधानी मनिला येथे घडली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या फिलिपिन्स दौऱ्यादरम्यान ऐतिहासिक खालसा दिवाण गुरुद्वाराच्या आधुनिकीकरण आणि पुनर्विकासाच्या भूमिपूजन सोहळ्यात सहभाग घेतला. हा केवळ एका धार्मिक स्थळाच्या नूतनीकरणाचा कार्यक्रम नसून भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारशाला मिळालेला जागतिक सन्मान आहे. मनिला येथील खालसा दिवाण गुरुद्वाराला शंभर वर्षांहून अधिक काळाचा गौरवशाली इतिहास लाभला आहे. १९०१ मध्ये या गुरुद्वाराची स्थापना झाली, १९०३ मध्ये त्याचे औपचारिक संघटन झाले आणि १९२४ मध्ये 'खालसा दिवाण' म्हणून त्याची अधिकृत नोंदणी करण्यात आली. फिलिपिन्समधील सर्वात जुन्या गुरुद्वाराचा मान या धार्मिक स्थळाला मिळाला आहे. अनेक पिढ्यांपासून या गुरुद्वाराने केवळ शीख समाजाच्या धार्मिक श्रद्धांचे केंद्र म्हणून नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवतावादी कार्याचे व्यासपीठ म्हणूनही आपली ओळख निर्माण केली आहे. शीख धर्माची शिकवण ही संपूर्ण मानवजातीला दिशा देणारी आहे. 'सेवा, सिमरन आणि समानता' या तत्त्वांवर आधारलेली शीख परंपरा समाजातील प्रत्येक घटकाला एकत्र आणण्याचे काम करते. गुरुद्वारातील लंगर परंपरा ही सामाजिक समतेचे सर्वश्रेष्ठ उदाहरण आहे. येथे जात, धर्म, भाषा, आर्थिक परिस्थिती असा कोणताही भेदभाव न करता सर्वांना एकाच पंक्तीत बसवून भोजन दिले जाते. मानवतेची ही शिकवण आजच्या विभाजनवादी आणि संघर्षमय जगात अधिक महत्त्वाची ठरते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा या भूमिपूजन सोहळ्यातील सहभाग हा भारत आणि फिलिपिन्स यांच्यातील सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करणारा आहे. परदेशात भारतीय समुदायाने आपल्या परंपरा, संस्कृती आणि धार्मिक मूल्यांचे जतन करण्यासाठी केलेले प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत. हजारो किलोमीटर दूर राहूनही आपल्या मातीशी आणि संस्कृतीशी नाळ जोडून ठेवणाऱ्या भारतीय समुदायाचे हे कार्य प्रेरणादायी आहे. जागतिकीकरणाच्या युगात अनेक देश आर्थिक विकासाच्या स्पर्धेत पुढे जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र विकासाच्या या प्रवासात ऐतिहासिक वास्तू, धार्मिक स्थळे आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन करणेही तितकेच आवश्यक आहे. कारण इतिहास जपणारा समाजच भविष्याचा भक्कम पाया उभारू शकतो. खालसा दिवाण गुरुद्वाराच्या पुनर्विकासातून हाच संदेश मिळतो. आधुनिक सुविधांची उभारणी करताना ऐतिहासिक ओळख आणि धार्मिक परंपरा अबाधित ठेवणे ही काळाची गरज आहे. भारताची परराष्ट्रनीती केवळ राजनैतिक चर्चा आणि आर्थिक करारांपुरती मर्यादित राहू नये.



आत्मकथनातील सोनियांचे 'असत्याचे प्रयोग'

सोनिया गांधींच्या राजकारणाचा हा प्रवास प्रेमाचा नव्हे तर विद्वेषाचाच होता हे साध्वी प्रज्ञा सिंह, कर्नल पुरोहित प्रकरणात दिसले आहे. या असत्य कथनातून आपली प्रतिमा उजळवण्याचा प्रयत्न सोनिया गांधींनी करून पाहिला आहे. मात्र यातून त्यांचेच पितळ उघडे पडले आहे.



काँग्रेसच्या माजी अध्यक्ष आणि २००४ ते २०१४ या काळातील पडद्यामागच्या पंतप्रधान सोनिया गांधी यांचे आत्मकथनपर पुस्तक नुकतेच बाजारात दाखल झाले आहे. काँग्रेसच्या अध:पतनाला सर्वार्थाने कारणीभूत ठरलेल्या सोनिया गांधी नामक नेतृत्वाने आत्मकथन करताना राजकीय स्वार्थापोटी आपल्याच कुटुंबीयांना बदनाम करत आपला निर्दयी, विश्वासघातकी चेहरा दाखवून दिला आहे. विवाह करून गांधी कुटुंबात दाखल झाल्यापासून २००४ ते २०१४ या दहा वर्षांतील काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या १० वर्षांच्या प्रवासाचा आढावा सोनिया गांधी यांनी या आत्मकथनातून घेतला आहे.

हा आढावा घेताना त्यांनी या प्रवासातील काँग्रेस आणि गांधी कुटुंबाच्या दृष्टीने कसोटीच्या ठरलेल्या काही घटनांबाबत मतप्रदर्शनही केले आहे. या मतप्रदर्शनातून सोनिया गांधी यांनी आपल्या असत्याच्या प्रयोगांची दीर्घ मालिका सादर केली आहे. कमालीच्या निगरगट्टपणे त्यांनी काही घटनांबाबत साळसूद भूमिका घेत आपण, आपले पती स्वर्गीय राजीव गांधी यांना निर्दोषत्वाचे प्रमाणपत्र देऊन टाकले आहे. या आत्मकथनात त्यांनी आपण गांधी घराण्याची सून होईपर्यंतच्या घटना कथन केल्या आहेत. या घटना त्यांच्या वैयक्तिक आयुष्याचा भाग असल्यामुळे त्यावर टीकाटिप्पणी करणे योग्य ठरणार नाही. मात्र राजकीय घडामोडी, सरकारी निर्णय प्रक्रिया या संदर्भात सोनिया गांधींनी केलेले खुलासे, व्यक्त केलेली मते यांचा समाचार घेणे भाग पडते.

या आत्मकथनातील सर्वात आक्षेपार्ह भाग म्हणजे आणीबाणीच्या कालखंडाविषयीच्या मतप्रदर्शनाचा. आणीबाणीचा कालखंड अनेक कारणांनी वादग्रस्त ठरला. आणीबाणीमध्ये सामान्य माणसाच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करून, विरोधी पक्षाच्या लाखो कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकून इंदिरा गांधींनी आपल्यातील क्रूर हुकूमशहाचे दर्शन घडवले होते. याखेरीज आणीबाणीमध्ये कुटुंब नियोजन कार्यक्रमाची सक्तीने अंमलबजावणी करताना सरकारी यंत्रणेने अत्याचारांचा कळस केला. हजारो अविवाहित पुरुषांवरही कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आल्या. आणीबाणीमधील अत्याचारांबद्दल इंदिरा गांधी यांचे कनिष्ठ पुत्र संजय गांधी आणि त्यांचे सहकारी विद्याचरण शुक्ल, बन्सीलाल यांना जबाबदार ठरवण्यात आले होते. या अत्याचारामुळे उत्तर भारतात इंदिरा गांधी, संजय गांधी आणि काँग्रेसविरोधात असंतोषाची जबरदस्त लाट निर्माण होऊन १९७७ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा मोठा पराभव झाला. इंदिरा आणि संजय गांधी या मायलेकरांच्या जोडीला मतदारांनी धूळ चारली. इंदिरा गांधींनाही कालांतराने आपली चूक उमगली. आणीबाणी लादणे ही आपली चूक होती, अशी कबुलीही इंदिराजींनी दिली होती. मात्र आणीबाणीतील अत्याचार आणि अन्य अप्रिय घटनांची जबाबदारी त्यांनी संजय गांधींवर ढकलण्याचा प्रयत्न केला नव्हता. जे काही झाले त्याची संपूर्ण जबाबदारी इंदिराजींनी स्वीकारली होती. आणीबाणीच्या काळात सोनिया या राजीव गांधी आणि मुलांच्या समवेत परदेशात होत्या.

५० वर्षे उलटून गेली तरी अजून आणीबाणीच्या कटू आठवणी पुसल्या गेल्या नाहीत. या विषयावर काँग्रेसला अजूनही बचावात्मक भूमिका घ्यावी लागते. आणीबाणीतील हुकूमशाहीच्या निर्णयाचा फटका काँग्रेसला बसल्यानंतर अनेक ज्येष्ठ नेत्यांनी इंदिरा गांधींची साथ सोडली. संजय गांधींच्या अपघाती मृत्यूनंतर इंदिरा गांधी एकाकी पडल्या. त्या स्थितीत त्यांनी राजीव गांधींना भारतात बोलावून घेतले.

राजीव गांधी १० वर्षे सक्रिय राजकारणात होते. या काळात त्यांनी आणीबाणीबद्दल आपल्या भावाला दोषी ठरवून स्वत:ला त्या घटनापासून अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न केला नव्हता. मात्र सोनिया गांधी आणीबाणीची जबाबदारी संजय गांधींवर ढकलून मोकळ्या झाल्या आहेत. त्या काळात दिल्लीतील तुर्कमान गेट भागातील अतिक्रमणे हटविण्यासाठी बुलडोझरचा वापर केला गेला. ही अतिक्रमणे मुस्लिम समुदायाची होती. बुलडोझरचा वापर करून ही अतिक्रमणे हटविल्याबद्दल सोनिया गांधी आपल्या आत्मकथनात नापसंती व्यक्त करतात. मात्र आपले पती पंतप्रधान झाल्यावर दिल्लीत आणि देशात इंदिरा गांधींच्या हत्येनंतर शीख समुदायाच्या नृशंस हत्याकांडाबद्दल मात्र त्या चकार शब्दानेही खेद व्यक्त करीत नाहीत. ५० वर्षांपूर्वीच्या तुर्कमान गेट परिसरात झालेल्या कारवाईची जबाबदारी आपल्या दिरावर ढकलून त्याबद्दल नाराजी व्यक्त करून मुस्लिम धर्मीयांना चुचकारण्याचा प्रयत्न करणाऱ्या सोनिया गांधी हजारो शीख नागरिकांच्या हत्याकांडाबद्दल मात्र मौन पाळतात. यातून त्यांचा ढोंगीपणा दिसून येतो. आणीबाणीमध्ये संजय गांधी हे घटनाबाह्य सत्ताकेंद्र बनले होते अशी टिप्पणी करणाऱ्या सोनिया गांधींना मनमोहन सिंग पंतप्रधान असताना २००४ ते २०१४ या काळात राष्ट्रीय सल्लागार परिषद अध्यक्षपद भूषविताना आपणही घटनाबाह्य सत्ताकेंद्रच बनलो होतो याचे सोयीस्कर विस्मरण झाले आहे. मनमोहन सिंग हे कसे नामधारी पंतप्रधान होते, याच्या अनेक सुरस कहाण्या त्या काळात मनमोहन सिंगांचे प्रसिद्धी सचिव असणाऱ्या संजय बारू यांनी आपल्या पुस्तकात कथन केल्या आहेत. राजीव गांधींना सत्तेतून पायउतार होण्यास भाग पडलेल्या बोफोर्स भ्रष्टाचार प्रकरणाबद्दलही सोनिया गांधींनी आपल्या पुस्तकात मौन पाळले आहे.

बोफोर्स प्रकरणातील मुख्य आरोपी क्वात्रोची याला वाचविण्यासाठी मनमोहन सिंग सरकार असताना कसे प्रयत्न झाले होते, याबद्दलच्या अनेक बातम्या त्यावेळी प्रसिद्ध झाल्या होत्या. त्याबद्दलही सोनिया गांधी अवाक्षर उच्चारीत नाहीत. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना सोनिया गांधी याच सरकार चालवत होत्या, याचे अनेक किस्से संजय बारू, चित्रा सुब्रमण्यम यांसारख्या नामवंत पत्रकारांनी लिहिले आहेत. त्याच सरकारच्या काळात हिंदू दहशतवादसारखी संकल्पना रुजविण्याचा प्रयत्न हेतुपूर्वक केला गेला. सोनिया गांधींच्या राजकारणाचा हा प्रवास प्रेमाचा नव्हे तर विद्वेषाचाच होता हे साध्वी प्रज्ञा सिंह, कर्नल पुरोहित प्रकरणात दिसले आहे. या असत्य कथनातून आपली प्रतिमा उजळवण्याचा प्रयत्न सोनिया गांधींनी करून पाहिला आहे. मात्र यातून त्यांचेच पितळ उघडे पडले आहे.

अमरावतीचे राजकारण : जनतेच्या प्रश्नांपेक्षा राजकीय प्रतिष्ठेची लढाई मोठी ठरतेय का?

विदर्भाच्या राजकारणात अमरावती जिल्ह्याचे स्थान नेहमीच महत्त्वपूर्ण राहिले आहे. सहकार, कृषी, शिक्षण, सामाजिक चळवळी आणि राजकीय नेतृत्वाची परंपरा लाभलेल्या या जिल्ह्याने राज्याच्या राजकारणाला अनेक प्रभावी नेते दिले आहेत. मात्र अलीकडच्या काळात अमरावतीच्या राजकारणात विकासाच्या मुद्द्यांबरोबरच आरोप-प्रत्यारोप, पक्षांतर्गत मतभेद, गटबाजी आणि राजकीय प्रतिष्ठेच्या लढाया अधिक चर्चेत येत आहेत.

जिल्ह्यातील राजकीय समीकरणे सातत्याने बदलताना दिसत आहेत. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेनेचे विविध गट आणि स्थानिक राजकीय संघटनांमध्ये आपापले राजकीय वर्चस्व निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. प्रत्येक पक्षाला आपली ताकद वाढवायची आहे, तर स्थानिक नेतृत्वाला आगामी राजकीय वाटचालीसाठी आपले स्थान मजबूत करायचे आहे. या सगळ्या घडामोडींमध्ये सामान्य मतदार मात्र विकासाच्या अपेक्षेने राजकीय नेतृत्वाकडे पाहत आहे.

अलीकडील अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीनेही जिल्ह्यातील राजकीय समीकरणांची चर्चा पुन्हा ऐरणीवर आणली. किरण सरनाईक यांनी काँग्रेसच्या प्रा. अदिती पोहरे यांचा पराभव करून ही जागा कायम राखली. या निवडणुकीत उमेदवारी, पक्षीय मतभेद आणि बंडखोरीचे मुद्देही चर्चेत राहिले. यावरून राजकीय आघाड्यांमधील अंतर्गत समन्वयाचे आव्हान स्पष्ट झाले.

दुसरीकडे, अमरावती जिल्ह्यातील मोर्शी नगरपरिषद परिसरात कथित मटण पार्टीच्या प्रकरणावरून भाजप आणि शिवसेनेमध्ये राजकीय वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणात भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन चौकशीची मागणी केली. सार्वजनिक कार्यालयांचा वापर आणि प्रशासनाची जबाबदारी यावरून निर्माण झालेला हा वाद स्थानिक राजकारणातील सध्याच्या वातावरणाचे उदाहरण आहे.



अमरावतीच्या राजकारणातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्थानिक नेतृत्वातील स्पर्धा. खासदार, आमदार, माजी लोकप्रतिनिधी आणि विविध पक्षांचे पदाधिकारी यांच्यातील राजकीय मतभेद अनेकदा सार्वजनिक चर्चेचा विषय बनतात. लोकशाहीमध्ये टीका आणि विरोधाला निश्चितच स्थान आहे. मात्र टीकेचे राजकारण करताना जनतेच्या प्रश्नांना दुय्यम स्थान मिळता कामा नये.

आज अमरावती जिल्ह्यासमोर अनेक गंभीर प्रश्न उभे आहेत. शेतमालाला योग्य भाव, सिंचनाच्या सुविधा, ग्रामीण भागातील रस्ते, पिण्याच्या पाण्याची समस्या, बेरोजगारी, उद्योगधंद्यांचा अभाव, आरोग्यसेवा आणि शिक्षणाच्या सुविधा या प्रश्नांवर ठोस काम होणे आवश्यक आहे. मेळघाटातील आदिवासी बांधवांचे प्रश्न, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती आणि तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न हे राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी असायला हवेत.

विशेषत: वरूड, मोर्शी, चांदूरबाजार, अचलपूर, दर्यापूर आणि मेळघाट परिसरातील नागरिकांना स्थानिक पातळीवर अनेक अपेक्षा आहेत. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या, शेतीमालाच्या बाजारपेठा, प्रक्रिया उद्योगांची उभारणी आणि शेतकऱ्यांना आवश्यक सुविधा मिळवून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.

राजकारणात सत्ता मिळिवणे हा प्रत्येक पक्षाचा अधिकार आहे. मात्र सत्ता ही जनतेने दिलेली जबाबदारी आहे, याचे भान लोकप्रतिनिधींनी ठेवणे आवश्यक आहे. विरोधकांवर टीका करणे सोपे असते; परंतु जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने काम करून त्यांचे निराकरण करणे ही खरी कसोटी असते.

अमरावतीच्या राजकारणाला आज केवळ नव्या राजकीय समीकरणांची नव्हे, तर विकासाच्या नव्या दृष्टिकोनाची गरज आहे. पक्षीय मतभेद बाजूला ठेवून जिल्ह्याच्या विकासासाठी सर्वपक्षीय सहकार्याची भूमिका स्वीकारली गेली पाहिजे. कारण रस्ते, पाणी, रोजगार, शिक्षण आणि आरोग्य या समस्या पक्षीय नसतात; त्या सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनाशी निगडित असतात.

शेवटी एकच प्रश्न उपस्थित होतो, अमरावतीचे राजकारण नेत्यांच्या प्रतिष्ठेसाठी चालणार की जनतेच्या प्रगतीसाठी? निवडणुका येतील आणि जातील, सत्तेची समीकरणे बदलतील, नेत्यांची पदे बदलतील; परंतु सामान्य माणसाचे प्रश्न कायम राहता कामा नयेत. राजकीय नेत्यांनी आरोप-प्रत्यारोपांच्या पलीकडे जाऊन विकासाच्या मुद्द्यांवर आपली ताकद दाखविण्याची वेळ आली आहे. अमरावतीच्या जनतेला राजकीय आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कामाचा हिशेब हवा आहे. लोकशाहीत अंतिम निर्णय जनता देते आणि जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करणारे नेतृत्वच काळाच्या कसोटीवर टिकते! अमरावती जिल्ह्याला नैसर्गिक साधनसंपत्ती, कृषी क्षेत्र आणि पर्यटनाच्या माध्यमातून प्रगतीच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. या संधींचा योग्य उपयोग करून जिल्ह्याला औद्योगिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सर्वपक्षीय नेतृत्वाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. राजकीय मतभेद हे लोकशाहीचे वैशिष्ट्य असले तरी जिल्ह्याच्या विकासाच्या बाबतीत एकमत असणे ही काळाची गरज आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

सहकारात महिलांना 33 टक्के प्रतिनिधित्व, तरुणांसाठीही राखीव जागांचा प्रस्ताव

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – राज्यातील सहकार क्षेत्राला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र सरकार नवीन सहकार धोरण जाहीर करण्याच्या तयारीत आहे. केंद्र सरकारच्या सूचनेनुसार तयार करण्यात आलेल्या या धोरणाचा मसुदा अंतिम टप्प्यात असून, येत्या १० ते १२ दिवसांत तो सूचना आणि हरकती नोंदवण्यासाठी सार्वजनिक करण्यात येणार आहे. नव्या धोरणात सहकारी संस्थांच्या संचालक मंडळांमध्ये महिलांना किमान ३३ टक्के प्रतिनिधित्व देण्याबरोबरच ४० वर्षांखालील तरुणांसाठीही निश्चित जागांची तरतूद करण्याचा प्रस्ताव आहे. तसेच पश्चिम महाराष्ट्रापुरते मर्यादित राहिलेले सहकाराचे जाळे मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात विस्तारण्यावर भर दिला जाणार आहे.

केंद्र सरकारने राष्ट्रीय सहकार धोरण तयार केल्यानंतर राज्य सरकारनेही स्वतंत्र सहकार धोरणाच्या दिशेने पावले टाकली आहेत. माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षतेखालील समितीने देशातील सहकार क्षेत्राचा वर्षभर अभ्यास करून केंद्र सरकारला अहवाल सादर केला होता. त्यानंतर राज्याच्या सहकार धोरणासाठी सुमारे २० ते २५ सदस्यांची उच्चस्तरीय समिती नियुक्त करण्यात आली. या समितीच्या आतापर्यंत चार बैठका झाल्या असून, त्यामध्ये सहकार क्षेत्रातील तज्ज्ञांनी विविध सूचना मांडल्या आहेत. सहकार भारतीच्या वतीनेही काही शिफारशी करण्यात आल्याची माहिती राज्याच्या सहकार धोरणविषयक उच्चस्तरीय समितीचे सदस्य विवेक जुगदे यांनी दिली. सहकारी संस्थांच्या संचालक मंडळांमध्ये महिलांचा सहभाग वाढवण्याचा मुद्दा नव्या धोरणात महत्त्वाचा ठरणार आहे. सध्या अनेक सहकारी संस्थांमध्ये दोन महिला संचालकांचा समावेश बंधनकारक आहे. मात्र, महिलांचे योगदान आणि नेतृत्वक्षमता लक्षात घेता ही संख्या वाढवण्याची गरज असल्याचे मत समितीसमोर मांडण्यात आले आहे.



राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीला दुष्काळ निवारणासाठी १५ लाखांचा निधी : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची घोषणा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून प्रत्येक ग्रामपंचायतीला १५ लाख रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. या निधीतून स्थानिक गरजांनुसार जलसंधारण आणि ग्रामविकासाची कामे हाती घेण्यासाठी स्वतंत्र आराखडा तयार केला जाणार असल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी केली. त्याचबरोबर वनपट्टा मिळाल्यानंतरही जमिनीचे स्वामित्व न मिळालेल्या आदिवासी शेतकऱ्यांना ७-ई आणि १२-ई प्रॉपर्टी कार्ड देण्याचा निर्णयही त्यांनी जाहीर केला.

पत्रकारांशी संवाद साधताना बावनकुळे यांनी राज्य सरकारच्या दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांची माहिती दिली. ते म्हणाले, दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्यातील ११ विभागांवर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, जलसंधारण आणि महसूल यांसह विविध विभागांच्या योजनांच्या अंमलबजावणीत बदल करून दुष्काळ निवारणाच्या कामांना प्राधान्य दिले जात आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून अनावश्यक कामे थांबवून आवश्यक उपाययोजनांसाठी निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. चारा संवर्धनापासून जलसंधारणापर्यंत सरकारने आतापर्यंत ४५ ते ४६ निर्णय घेतले असून, त्यातून दुष्काळाचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

प्रत्येक ग्रामपंचायतीला देण्यात येणाऱ्या १५ लाख रुपयांच्या निधीतून गावपातळीवरील गरजांनुसार जलसंधारण आणि ग्रामविकासाची कामे नियोजनबद्ध पद्धतीने करता येतील. यासाठी स्वतंत्र आराखडा तयार केला जाणार आहे. दुष्काळी भागांमध्ये पाण्याची उपलब्धता वाढवणे आणि स्थानिक पातळीवर आवश्यक कामे मार्गी लावणे, हा या नियोजनाचा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्याचप्रमाणे वनहक्क कायद्यांतर्गत वनपट्टा मिळाला असला, तरी जमिनीचे स्वामित्व दर्शवणारी कागदपत्रे अद्याप न मिळालेल्या आदिवासी शेतकऱ्यांना आता ७-ई आणि १२-ई प्रॉपर्टी कार्ड देण्यात येणार आहेत. सामान्य शेतकऱ्यांकडे सातबारा उतारा असतो, त्याच धर्तीवर आदिवासी वनपट्टाधारकांना जमिनीच्या स्वामित्वाचा पुरावा उपलब्ध करून देण्याची ही व्यवस्था असेल.



आदिवासी वारसा, अभिमान आणि स्वाभिमानाचा जनजातीय गौरव दिवस २०२६ उत्साहात साजरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – धरती आबा, क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त, आदिवासी संस्कृती, परंपरा आणि गौरवशाली वारशाचा जागर करण्यासाठी महादेव नगर वस्ती वरुड येथे जनजातीय गौरव दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

केवळ उत्सव नाही तर सक्षमीकरणाचा संकल्प या दिनानिमित्त समाजाच्या सक्षमीकरणासाठी गरजू लाभार्थ्यांना विविध महत्त्वाच्या योजनांच्या लाभाचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी आदिवासी माता-भगिनींना महिला शेतकरी प्रमाणपत्र वितरण करुन सन्मान, प्रत्येक कुटुंबाला २.५ लाखांपर्यंत मोफत उपचाराची हमी देत आयुष्मान भारत कार्ड वाटप करण्यात आले, युवा पिढीला स्पर्धा परीक्षेसाठी बळ मिळावे याकरीता महासारथी कार्ड वाटप याप्रसंगी उपस्थितांना करण्यात आले. या सेवा कार्य प्रसंगी आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर, नगराध्यक्ष ईश्वर सलामे, उपाध्यक्षा कविता उपरकर, आरोग्य सभापती विनय खासबागे, नगरसेवक संदीप देवते, मुरलीधर पवार, प्रकाश माळोदे, नरेंद्र उपरकर, सर्व नगरसेवक, नगरसेविका आणि महादेव नगर परिसरातील मोठ्या संख्येने नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

भगवान बिरसा मुंडा यांनी दाखविलेल्या जल, जंगल, जमीनच्या रक्षणाच्या मार्गावर चालत, वरुडच्या प्रत्येक आदिवासी बांधवाला शासनाच्या योजनेचा लाभ मिळवुन देणे, हेच आमचे ध्येय असल्याचे आयोजकांनी यावेळी सांगितले.





राजू शेट्टींच्या स्वाभिमानीचं सोलापूरमधील ऊस दर आंदोलन स्थगित, १९ नोव्हेंबरला बैठक : साताऱ्यात स्वाभिमानीला पहिलं यश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

सोलापूर – जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊसाला पहिली उचल ३५०० रुपये मिळावी यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर सोमवारी आंदोलन केलं होतं. रात्री उशिरा पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली १९ नोव्हेंबरला बैठक घेण्यात येणार असल्यानं तोपर्यंत आंदोलन स्थगित करत असल्याचं राजू शेट्टी यांनी म्हटलं. १९ तारखेच्या बैठकीत तोडगा न निघाल्यास सोलापूर रेल्वे स्टेशनवरील वाहतूक बेमुदत रोखण्याचा इशारा राजू शेट्टी यांनी दिला. दुसरीकडे साताऱ्यात स्वाभिमानी शेतकरी संघटनेला पहिलं यश मिळालं आहे. शिवनेरी शुगर्सनं ऊसाला प्रतिटन पहिली उचल ३९०० रुपये देण्याची घोषणा केली आहे. साताऱ्यात जिल्हाध्यक्ष राजू शेळके यांच्या नेतृत्त्वात स्वाभिमानीचं आंदोलन सुरु आहे.

बैठकीपर्यंत गाळप बंद ठेवण्याचे आदेश माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात सोलापुरात सुरु असलेलं ऊस दर आंदोलन अखेर स्थगित करण्यात आलं आहे. ऊस दराच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली १९ नोव्हेंबर रोजी बैठक होणार आहे. ऊस दराबाबत बैठक होईपर्यंत साखर कारखान्यातील गाळप बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी राजू शेट्टी यांना कारखाने बंद करण्याचे लिखित आदेशाची प्रत दिली.विशेष म्हणजे या बैठकीला जिल्ह्यातील कारखान्यानी प्रतिनिधी न पाठवता स्वतः चेअरमन उपस्थित राहणे बंधनकारक करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी रात्री उशिरा आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला फसवणूक झाल्यास सोलापूर रेल्वे स्टेशनवरील वाहतूक रोखण्याचा इशारा १९ तारखेच्या बैठकीत जर फसवणूक झाली तर आम्ही आणखी तीव्र आंदोलन करू असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे. सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी बैठकीत एकरकमी पहिली उचल ३५०० रूपये जाहीर न केल्यास सोलापूर शहरातील रेल्वे स्टेशन वर रेल्वेची वाहतूक बेमुदत रोखण्याचा निर्णय घेतल्याचं राजू शेट्टी यांनी सांगितलं.

साताऱ्यात स्वाभिमानीला पहिलं यश सातारा जिल्ह्यात देखील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचं आंदोलन सुरु आहे. राजू शेट्टी यांच्या मार्गदर्शनात जिल्हाध्यक्ष आणि जिल्हा परिषद सदस्य राजू शेळके यांच्याकडून सातारा जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी कोल्हापूर पॅटर्नप्रमाणे ऊसाला दर जाहीर करावा या मागणीसाठी जिल्ह्यात आंदोलन सुरु आहे.



लखनऊ विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय ग्रंथालय शिखर संमेलनात 'भीमाची लेकरं ऑर्गनायझेशन'चा गौरव!

अध्यक्ष, विषयतज्ज्ञ व अहवालकर्ते म्हणून सदस्यांचा सहभाग

आयोजक डॉ.एम.पी.सिंग व डॉ.प्रवीण प्रकाश यांचाही संविधानाची प्रत देऊन सन्मान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मोर्शी – लखनऊ विद्यापीठाच्या वतीने आयोजित १४ व्या आंतरराष्ट्रीय ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यावसायिक शिखर संमेलन २०२६ मध्ये सामाजिक, शैक्षणिक आणि ग्रंथालय क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या नागपूर येथील 'भीमाची लेकरं ऑर्गनायझेशन' या संघटनेचा विशेष गौरव करण्यात आला. ३० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत पार पडलेल्या या आंतरराष्ट्रीय संमेलनात संघटनेच्या सदस्यांनी विविध महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या.

देशभरातील ग्रंथालय व माहितीशास्त्र क्षेत्रातील मान्यवर, संशोधक, प्राध्यापक आणि व्यावसायिकांच्या उपस्थितीत झालेल्या या संमेलनात संघटनेच्या काही सदस्यांनी अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली, तर काहींनी विषयतज्ज्ञ म्हणून मार्गदर्शन केले. तसेच अनेक सदस्यांनी अहवालकर्ते म्हणून विविध शैक्षणिक सत्रांचे कामकाज आणि निष्कर्ष नोंदविण्याची जबाबदारी पार पाडली.संघटनेच्या सदस्यांचे शैक्षणिक, व्यावसायिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान लक्षात घेऊन संमेलनाचे आयोजक दिल्ली विद्यापीठाचे डॉ. एम. पी. सिंग आणि लखनऊ विद्यापीठाचे डॉ.प्रवीण प्रकाश यांनी त्यांचा विशेष सन्मान केला. या गौरवामुळे संघटनेच्या सदस्यांमध्ये आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी कृतज्ञता व्यक्त करत 'भीमाची लेकरं ऑर्गनायझेशन'च्या वतीने संमेलनाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल आयोजक डॉ.एम.पी.सिंग व डॉ.प्रवीण प्रकाश यांचाही शाल, सन्मानपत्र आणि भारतीय संविधानाची प्रत भेट देऊन गौरव करण्यात आला.

या संमेलनात ग्रंथालयीन व्यावसायिक ज्ञानाची देवाणघेवाण, संशोधनविषयक विचारमंथन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि ग्रंथालयांच्या बदलत्या स्वरूपावर सविस्तर चर्चा झाली. संघटनेच्या सदस्यांनी केवळ सहभागी न होता विविध जबाबदाऱ्या स्वीकारून संमेलनाच्या यशस्वितेत मोलाचे योगदान दिले.

'भीमाची लेकरं ऑर्गनायझेशन' ही संघटना ग्रंथालयीन व्यावसायिकांना एकत्र आणण्यासोबतच भारतीय संविधानाचा प्रचार-प्रसार, वाचनसंस्कृतीचे संवर्धन, सामाजिक प्रबोधन आणि शैक्षणिक परिवर्तनासाठी सातत्याने कार्यरत आहे. लखनऊ येथील आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर संघटनेच्या सदस्यांनी केलेले कार्य त्यांच्या ज्ञान, कौशल्य आणि संघटनात्मक बांधिलकीची साक्ष देणारे ठरले.

या संमेलनात संस्थेचे अध्यक्ष डॉ.दिलीप पाटील, सचिव डॉ.संजय रायबोले, कोषाध्यक्ष डॉ.चंद्रमणी गजभिये, उपाध्यक्ष डॉ.अरविंद पाझारे, सहसचिव डॉ.नितीन चवरे, डॉ.बालाजी कांबळे, प्रा.मंगेश वागदे, डॉ.उमेश कुऱ्हाडे, डॉ.नितेश मोटघरे, डॉ.रविकांत महिंदकर, डॉ.संदेश डोंगरे, डॉ.शर्मिला चिकाटे, प्रा.विवेक पाचपोर यांच्यासह अन्य सदस्य सहभागी झाले होते. सर्वांनी या आंतरराष्ट्रीय संमेलनातील सहभागाबद्दल समाधान व्यक्त करत हा अनुभव प्रेरणादायी आणि अविस्मरणीय असल्याच्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.



मोर्शी नगरपरिषद मटण-मच्छी पार्टीचा वाद पेटला!

मुख्याधिकारी व सत्ताधारी नगरसेवकांवर कठोर कारवाईची आमदार उमेश यावलकर यांची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मोर्शी – मोर्शी नगरपरिषदेच्या नवनिर्मित प्रशासकीय इमारतीमध्ये दिवाळीच्या काळात आयोजित करण्यात आलेल्या मटण-मच्छी पार्टीमुळे शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

शासकीय कार्यालयाच्या परिसरात अशा प्रकारे मटण-मच्छी पार्टीचे आयोजन करण्यात आल्याने या प्रकरणावरून आता राजकीय वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित मुख्याधिकारी, कर्मचारी तसेच सत्ताधारी नगरसेवकांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आमदार उमेश यावलकर यांनी केली आहे.

दि.१३ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ ते मध्यरात्री १२ वाजेपर्यंत मोर्शी नगरपरिषदेच्या नवनिर्मित प्रशासकीय इमारतीमध्ये नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, नगरसेवक आणि नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या सहभागातून मटण-मच्छी पार्टीचे आयोजन करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. सार्वजनिक कार्यालयाच्या परिसरात अशा प्रकारचे आयोजन करणे कितपत योग्य आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

या पार्टीमध्ये मटण आणि मच्छीचे भोजन झाल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला असून, या प्रकारामुळे सार्वजनिक कार्यालयाच्या शिस्तीला आणि कार्यालयीन कामकाजाच्या प्रतिष्ठेला बाधा पोहोचल्याचे नमूद करण्यात आले आहे.

नगरपरिषद ही नागरिकांच्या करातून चालणारी स्थानिक स्वराज्य संस्था आहे. अशा शासकीय कार्यालयाचा वापर खासगी मेजवानीसाठी करण्यात आला असेल, तर त्याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. या प्रकरणातील सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी व लोकप्रतिनिधींची चौकशी करून दोषींवर प्रशासकीय तसेच शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात आमदार उमेश यावलकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सोमवारी (दि.१६) संबंधित प्रशासनाकडे निवेदन सादर केले. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर नियमानुसार कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

या मटण-मच्छी पार्टी प्रकरणामुळे मोर्शी नगरपरिषद पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली असून, प्रशासन या प्रकरणात कोणती भूमिका घेते आणि संबंधितांवर काय कारवाई होते, याकडे मोर्शीकरांचे लक्ष लागले आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी राष्ट्रवादीच्या आमदारांचा मोठा निर्णय

एक महिन्याचे वेतन देणार!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवांना मदतीचा हात देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधानसभा आणि विधान परिषदेतील सर्व आमदारांनी आपले एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीस देण्याचा महत्वाचा निर्णय घेतला आहे. या वेतनाचे धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

शेतकरी बांधवांवर आलेल्या संकटाच्या काळात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना आवश्यक ती मदत मिळवून देणे, हीच अजितदादांनी आपल्याला दिलेली खरी शिकवण आहे. दादांच्या याच विचारांचा वारसा पुढे नेत, शेतकऱ्यांच्या दुःखात सहभागी होऊन त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी योगदान देणे, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. तसेच शेतकरी बांधवांच्या हितासाठी सदैव कटिबद्ध राहणे, हाच यामागचा प्रामाणिक भाव आहे असे आमदारांनी या बैठकीत स्पष्ट केले. यावेळी बैठकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, ज्येष्ठ नेते आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, महिला व बालविकास मंत्री अदितीताई तटकरे यांसह पक्षाचे सर्व आमदार उपस्थित होते.

त्यांनी सर्वानुमते हा निर्णय घेतला आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीबाबत विविध राजकीय व सामाजिक स्तरांतून वेगवेगळ्या भूमिका मांडण्यात आल्या आहेत.

गोकुळचे नवनिर्वाचित चेअरमन राजेश पाटील यांनी घेतली सुनेत्रा पवार यांची भेट

शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देण्याचे आवाहन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



कोल्हापूर – कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळचे नवनिर्वाचित चेअरमन राजेश पाटील आणि संचालक मंडळाच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची मंत्रालयात सदिच्छा भेट घेतली. १७ नोव्हेंबर रोजी झालेल्या या भेटीदरम्यान गोकुळच्या कामकाजाबाबत चर्चा झाली. दूध उत्पादक शेतकऱ्यांचे हित केंद्रस्थानी ठेवा या भेटीदरम्यान सुनेत्रा पवार यांनी नवनिर्वाचित चेअरमन राजेश पाटील आणि संचालक मंडळाशी संवाद साधला. गोकुळ दूध संघाचा कारभार करताना दूध उत्पादक शेतकरी सभासदांचे हित नेहमी केंद्रस्थानी ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

संघाचे कामकाज शिस्तबद्ध, पारदर्शक आणि काटेकोरपणे चालवण्यावर भर द्यावा. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांचा संस्थेवरील विश्वास अधिक दृढ होईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. आर्थिक शिस्त आणि व्यवस्थापनावर भर दूध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक हित जपण्यासोबतच गोकुळची विश्वासार्हता आणि प्रगती कायम राखणे महत्त्वाचे असल्याचे सुनेत्रा पवार यांनी सांगितले. सहकार क्षेत्रातील या महत्त्वाच्या संस्थेचा कारभार अधिक सक्षम करण्यासाठी चेअरमन आणि सर्व संचालकांनी एकजुटीने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले. या सदिच्छा भेटीदरम्यान गोकुळच्या नवनिर्वाचित नेतृत्वाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

अजित पवार महायुतीत आले नाहीत, त्यांना अटकेच्या धमक्या देऊन ओढून आणलं, अमित शाहांकडून ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे खोटे आरोप: संजय राऊत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



नवी दिल्ली – अजित पवार यांच्या पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अजितदादांविषयी इतका उमाळा दाटून आला होता, तर मग त्यांच्या विमान अपघात प्रकरणात एफआयआर दाखल का करण्यात आली नाही?

एरवी राज्याचे गृहमंत्री फाल्तू गोष्टींवर एफआयआर दाखल करायला सांगतात. मग अजितदादांच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणात त्यांनी एफआयआर दाखल का करुन दिला नाही, असा सवाल ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला. ते मंगळवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस हे अजित पवार यांच्या अपघात प्रकरणाच्या तपासाची फाईल दाबत आहेत. अमित शाह यांनी ईडीचा वापर अजित पवार हे जिवंत असताना त्यांच्या पाठीशी लावण्यासाठीच केला का? सीबीआयकडून अजित पवार यांच्या मृत्यूचा तपास होऊ शकत नाही का?, असा सवाल संजय राऊत यांनी उपस्थित केला. रोहित पवार यांनी काल मफलर मॅनचं कोडं सोडवलं. ज्या विमान कंपनीचे विमान अजित पवार यांनी अपघातावेळी वापरले होते, त्यामध्ये गडबड होती, असे अनेकांचे म्हणणे आहे. आपले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या विमान कंपनीच्या मालकाच्या मुलाच्या लग्नात पदर घेतल्यासारखा मफलर घेऊन हसत वावरत होते. जे काल रोहित पवारांनी दाखवलं, त्यासाठी त्यांचे कौतुक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर भाष्य केले पाहिजे.

आरोग्यांच्या मुद्द्यावर शिवसेना आक्रमक, महापौरांकडे केली आरोग्य समस्यांवर चर्चा करण्यासाठी विशेष सभेची मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – महापालिकेच्या केईएम रुग्णालयातील बंद लिफ्टसंदर्भात शिवसेना आक्रमक झाली असून या प्रकरणाच्या चौकशीचा अहवाल सर्वपक्षीय गटनेत्यांसमोर सादर करण्यात यावा आणि मुंबईतील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी नोव्हेंबर महिन्यात महानगरपालिकेची विशेष सभा आयोजित करण्याची मागणी शिवसेनेच्या गटनेत्यांनी महापौरांकडे पत्राद्वारे केली आहे. शिवसेनेचे महापालिका गटनेते अमेय घोले यांनी महापौरांना लिहिलेल्या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील केईएम रुग्णालयातील लिफ्ट अनेक दिवस बंद आहे. त्यामुळे रुग्ण, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती व त्यांच्या नातेवाईकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ चे कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२५१/२०२६ ने.ता.०३/१२/२०२६

अर्जदार :- प्रगती किशोरराव तडस (माहेरचे नांव)
प्रगती अनिकेत होले (सासरचे नांव)
वय अं.२९ वर्ष, धंदा-गृहिणी
रा.कावरा पेठ, शांती नगर, नागपूर, ता.जि.नागपूर

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- सचिव साहेब
ग्रामपंचायत कार्यालय पुसला, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे प्रगती किशोरराव तडस हिचा जन्म दि.२७/११/१९९७ रोजी मु.पो.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ चे कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **नामे प्रगती किशोरराव तडस हिचा जन्म दि.२७/११/१९९७ रोजी मु.पो.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.०३/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

ऑनलाइन शॉपिंगच्या नावाखाली नवा स्कॅम ! ऑर्डर न करताच घरी येतंय पार्सल, ग्राहकांनी सावध राहण्याचं सायबर पोलिसांचं आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



अकोला – ऑनलाइन खरेदीचा वाढता ट्रेंड पाहता सायबर गुन्हेगारांनी फसवणुकीचे नवनवीन मार्ग शोधण्यास सुरुवात केली आहे.

आता ग्राहकांच्या घरच्या पत्त्यावर बनावट पार्सल पाठवून पैसे उकळण्याचा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, ग्राहकांनी कोणतीही ऑर्डर दिलेली नसतानाही त्यांच्या नावाने पार्सल घरी पोहोचवले जात आहे. त्यानंतर कुरिअर कर्मचारी ऑनलाइन पेमेंटसाठी दबाव टाकत असल्याचे समोर आले आहे.

ऑर्डर न करताच घरी पोहोचले पार्सल अकोला जिल्ह्यातील अकोट शहरात राहणारे नरेश नालट यांच्यासोबत अशाच प्रकारची फसवणूक झाल्याचे उघड झाले आहे. त्यांच्या घरी एक पार्सल आले. पार्सल स्वीकारल्यानंतर त्यांनी ऑनलाइन पद्धतीने पैसे भरले. मात्र, पार्सल उघडून पाहिल्यानंतर त्यामध्ये असलेली पॅन्ट फाटलेली आणि अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याचे त्यांच्या लक्षात आले. यानंतर त्यांनी वस्तू परत करण्यासाठी रिटर्न रिक्वेस्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी धक्कादायक बाब समोर आली. संबंधित वस्तू त्यांनी ऑनलाइन बुकच केली नव्हती. म्हणजेच, त्यांच्या नावाने आणि पत्त्यावर कोणतीही ऑर्डर नसताना बनावट पार्सल पाठवण्यात आले होते.

छठपूजेनंतर गोदाघाटाची स्वच्छता, ४.७६ टन निर्माल्य संकलित

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



नाशिक – छठपूजा महोत्सवानंतर गोदावरी नदी परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी नाशिक महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने विशेष स्वच्छता मोहीम राबविली. या मोहिमेत ४ टन ७६० किलो निर्माल्य व तत्सम कचरा संकलित करण्यात आला. तसेच स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १२ व्यक्तींवर कारवाई करून ७ हजार ७८० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

महापौर हिमगौरी आहेर-आडके, उपमहापौर विलास शिंदे व स्थायी समिती सभापती मच्छिंद्र सानप यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच आयुक्त मनीषा खत्री यांच्या निर्देशानुसार ही मोहीम राबविण्यात आली. अतिरिक्त आयुक्त अमित रंजन व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे संचालक डॉ.आवेश पलोड यांनी मोहिमेचे मार्गदर्शन केले. छठपूजेच्या पार्श्वभूमीवर पंचवटीतील रामकुंड, नांदूर घाट व गोदावरी नदीकाठच्या परिसरात स्वच्छतेची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. विभागीय अधिकारी राहुल जाधव व विभागीय स्वच्छता निरीक्षक संजय दराडे यांनी आयोजक, भाविक आणि नागरिकांमध्ये जनजागृती केली.

ध्वनिक्षेपकाद्वारे निर्माल्य नदीपात्रात न टाकता निर्माल्य कलशात जमा करणे, प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळणे आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकण्याचे आवाहन करण्यात आले.



५० टक्के जागा वाढवल्यास मतदारसंघ फेररचनेला पाठिंबा : राष्ट्रवादी पवार गटाचा पुनरुच्चार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



पुणे – केंद्र सरकारने डिलिमिटेशनच्या माध्यमातून देशभरात ५० टक्के जागा वाढवण्याचा प्रस्ताव आणल्यास, त्याला सहकार्य करण्यास आमचा पक्ष सकारात्मक आहे. मात्र, या सहकार्यासाठी केंद्र सरकारसमोर आमच्या दोन प्रमुख अटी आहेत. पहिली अट म्हणजे, जम्मू-काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत देशातील सर्व राज्यांसाठी एकच आणि समान फॉर्म्युला लागू केला गेला पाहिजे. दुसरी अट म्हणजे, फेररचनेनंतर महिला आरक्षणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालीच पाहिजे. या विधेयकाला महाविकास आघाडी आणि काँग्रेससह संपूर्ण विरोधी पक्षांनी एकमुखाने पाठिंबा दिलेला आहे, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सोमवारी मांडली. सुळे म्हणाल्या, गृहमंत्री अमित शाह आणि संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू यांनी या संदर्भात खासदार सुप्रिया सुळे, शिवसेना नेते अरविंद सावंत, एआयएम आयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी आणि समाजवादी पक्षाच्या नेत्यांना चर्चेसाठी आमंत्रित केले होते.

तापमान

	कमाल	किमान
अमरावती	२९	२४
यवतमाळ	२८	२१
अकोला	२७	२४
वाशिम	२८	२३
बुलढाण	२७	२२
वर्धा	३०	२३
नागपूर	२९	२४
चंद्रपुर	२९	२५
गडचिरोली	२८	२३
नाशिक	२६	२२
पुणे	३०	२१

मोर्शी पोलिसांची अवैध गोवंश वाहतुकीवर मोठी कारवाई!

चार गोवंश जनावरांसह दोन चारचाकी वाहने जप्त

७ लाख ७९ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मोर्शी – अवैध गोवंश वाहतुकीविरुद्ध मोर्शी पोलिसांनी धडक कारवाई करीत चार गोवंश जनावरांसह दोन मालवाहू चारचाकी वाहने असा एकूण ७ लाख ७९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई रविवार, १५ नोव्हेंबर रोजी सकाळी मोर्शी रोडवरील बैलबाजार परिसरात करण्यात आली.

मोर्शी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण व पोलीस अंमलदार वरिष्ठांच्या आदेशानुसार अवैध गोवंश वाहतुकीविरुद्ध पेट्रोलिंग करीत असताना बैलबाजार परिसरात दोन संशयित मालवाहू वाहने आढळून आली. पोलिसांनी पंचांसमक्ष या वाहनांची तपासणी केली असता दोन्ही वाहनांमध्ये प्रत्येकी दोन याप्रमाणे एकूण चार गोवंश जनावरे अत्यंत निर्दयीपणे व कोंबून वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले.

या कारवाईत महिंद्रा सुप्रो मॅक्सी ट्रक (क्र.एमएच-३४-एव्ही-२९४३) किंमत ३ लाख ५० हजार रुपये व त्यातील दोन गोवंश जनावरे किंमत ३७ हजार रुपये, तसेच महिंद्रा मॅक्सिमो सीआरडी (क्र.एमएच-३१-सीक्यू-७८०२) किंमत ३ लाख ५० हजार रुपये व त्यातील दोन गोवंश जनावरे किंमत ४२ हजार रुपये, असा एकूण ७ लाख ७९ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

या प्रकरणी सय्यद समीर सय्यद जमीर (वय २०) व सय्यद जाफर सय्यद जमीर (वय २०), दोघेही रा. गांधी पूल रोड, फरमानपुरा, अचलपूर, जि. अमरावती, तसेच जनावरांचे मालक सुभाष पंडोळे, रा. हिवरखेड, ता. मोर्शी यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली, मोर्शी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

या पथकात पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण, स्वप्नील बायस्कर, छत्रपती करपते व अथर्व कोहळे यांनी सहभाग घेतला. अवैध गोवंश वाहतुकीविरुद्ध पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे परिसरात अशा प्रकारच्या अवैध वाहतुकीला आळा बसण्यास मदत होणार आहे.

जुगार खेळतांना ५ जुगारी रंगेहात पकडले



बेनोडा पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेची मांगरुळीत कारवाही

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – पोलीस स्टेशन बेनोडा (शहीद) व स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीण यांना तालुक्यातील मांगरुळी शेतशिवारात काही ईसम जुगार खेळत असल्याचे माहीती मिळाल्यावरुन धाड टाकली असता ५ जणांना जुगार खेळतांना रंगेहात पकडण्यात आले, त्यांचेजवळून ९ हजार ३०० रुपयांची रोख रकमेसह इतर साहित्य जप्त करण्यात आले.

या प्रकरणात लीलाधर श्रावण गोरले (४६), प्रहार भाऊराव मोरे (३५), सुरज लक्ष्मणराव दूधकवडे (२४) तिन्ही रा.जरुड, हर्षल सुरेश सिनकर (२२), आकाश किसनराव चौधरी (२७) रा.सावता चौक वरुड अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

या धाडीत आरोपींचे ताब्यातुन नगदी ९ हजार ३०० रुपये दोन मोटर सायकल असा एकूण २ लाख ३० हजार ६३० रुपयांचा मुददेमाल जप्त केला.

ठाणेदार विवेक ठाकरे यांचे मार्गदर्शनाखाली बेनोडा पोलीस स्टेशन येथील पोलिस उपनिरिक्षक राजेंद्र काळे, पो.कॉ.पवन भोकरे, निलेश डफडे, विद्याधर वंजारी, पो.कॉ.किरण लकडे महिला चालक निक्कीता उमाळे तसेच स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीण पथकातील पोलीस हवालदार रुपेश गावंडे, पो.कॉ.विवेक घोरमाडे, शांताराम सोनोने यांनी केली. पोलिसांच्या या कारवाहीमुळे अवैधरित्या व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.





